# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०२२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

=================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

=================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे काही कारण असो वा नसो सतत अपमान होणे संभवते. त्यामुळे मनात डूख धराल. त्याशिवाय वातविकाराचे अनारोग्य त्रस्त करण्याची शक्यता दिसते. येथील हर्षलमुळे स्वभाव लहरी, अस्थिर, चंचल असा घडणे संभवते. पण तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारच्या आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. .तसेच उष्णता विकाराचा आजार त्रस्त करणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा मंगळ या राशीच्या तृतीय स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून काही कर्तृत्व घडेल; पण एखादी इजा होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत रवि, बुध आणि अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून येथील रवि दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल, पण तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होणे संभवते. पण तो केन्द्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होणेही संभवते. येथील बुध महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व नियोजित कार्यसिद्धी होईल व यशदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे धनलाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे दु:ख, वाद, भांडणे होणे संभवते. येथील शुक्र अस्तंगत असल्यामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना कलागुण असूनही ते प्रकट करण्याची संधीच मिळणार नाही. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत गेल्यावरही विवाहसंबंधी अपेक्षित गोष्टी घडतीलच याची खात्री देता

येत नाही. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतु आहेच. त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. मनस्थिती अस्थिर राहील. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे नोकरी-व्यवसायात क्रान्तिकारक घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. तसेच कुमार्गी मित्रांपासून मनस्ताप दिला जाण्याची शक्यताही दिसते. असे घडले तर नैराश्य येईल. या राशीच्या व्ययस्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो अध्यात्म व सामाजिक कार्य यांस अनुकुल असला तरी वक्री असल्याने अपेक्षित प्रगती होणे संभवत नाही. तसेच त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच प्रवासात अडचणी येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी “ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ** - या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मिथुन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होणार असून त्याच्यामुळे स्वभाव हट्टी, मानापमान फार असणारा असा घडेल. त्यामुळे अकारण शरीरपीडा, दगदग व श्रम केले जातील व त्यामुळे थकवा येणे संभवते. त्याशिवाय आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत तो अधिक मनस्तापदायक असल्याचा अनुभव येईल. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत रवि -बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे अनारोग्य, अपघात होणे संभवते. म्हणून सतत सावधानतेने आचरण करा. तसेच संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेलसे दिसते. तसेच कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. बुधामुळे बुद्धी मंद होईल, संतती-स्त्रीपासून त्रास होणे संभवते. कला क्षेत्रास शुक्र अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्यामुळे कोणत्याही कलेचे शिक्षण घेत असणारांना अडचणी, अडथळे सहन करीतच

प्रगतीसाठी प्रयत्न करावे लागतील. महिन्याच्या उत्तरार्धात हे तिन्ही ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत गेल्यावर रवि दशम या व्यवसायस्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील, पण तो अनारोग्यकारक होण्याची शक्यता दिसते. बुधामुळे कार्यसिद्धी होईल. पण शुक्र अस्तंगत असल्यामुळे कलाकार मंडळींना आपल्या कलेतील प्रगती दाखविण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी प्रथमपासून केतू आहेच. तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अडचणी, अडथळे सहन करीतच प्रगतीसाठी प्रयत्न करावे लागतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होईल. पण तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने अपेक्षा पूर्ण करण्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे इच्छा, अपेक्षा पूर्ण होण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता दिसते. धनप्राप्तीतही अडचणी निर्माण होतील. विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतील. विवाहेच्छूना विवाहयोग असला तरी योग घडून येईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून राहूमुळे अर्थलाभ होणे संभवते. पण दिखाऊ आचरण होईल. येथील वक्री हर्षलमुळे सांपत्तिक अडचणी, वाईट प्रसंग, शत्रुत्व अशापैकी घटना घडणे संभवते. शिवाय तो अपघातकारकही आहे. जपा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत येत आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. वाद, भांडणे होतील, मानहानी होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे स्वभाव हट्टी होईल, मानापमान फार असतील व अकारण श्रम,

दगदग कराल. नोकरदार मंडळींना नोकरीत प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जावे लागेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत रवि -बुध- अस्तंगत  शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत जात आहेत.अशा परिस्थितीत हे तिन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील. रविमुळे अनारोग्य, अपघात, कार्यदिरंगाई, दुःख, कौटुंबिक त्रास, आर्थिक चिंता अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात बुधामुळे गृहसौख्य ,मित्रसुख लाभेल; पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे बुद्धी मंद होईल, कसले तरी भय अस्वस्थ करील व संततीपासून मनस्ताप दिला जाणे संभवते. शुक्र अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्याने ज्यांची शेतीवाडी आहे अशा मंडळींना शेतीपासून अपेक्षित लाभ होणे अशक्य दिसते. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतू आहेच. तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे अध्यात्म व गूढ संशोधन यांची मनापासून आवड असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य होणे, अपघात भय असणे संभवते. शिवाय तो दुःख, दैन्य देण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. अध्यात्माची मनापासूनान ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अडचणी, अडथळे सहन करीतच प्रगतीसाठी प्रयत्न करावे लागतील. . या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून या राशीच्या ज्या मंडळींना अधिकार पद प्राप्त झाले आहे अशापैकी काही मंडळींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाम मार्ग धान मिळविण्याचा मोह होईल. शिवाय संततीपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करीतसे दिसते. येथील वक्री हर्षलमुळे काय घडेल ते सांगता येणार नाही. पण त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीजगदंबा दुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "दुर्गादेवी स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी "ओम नमः:शंकराय " तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत रवि -बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, दु:ख सहन करावे लागणे, कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे, त्यामुळे नैराश्य येणे संभवते. बुधामुळे महिन्याच्या पूर्वार्धात शत्रुत्व निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळू शकेल. शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल असला तरी तो अस्तंगत असल्यामुळे सहज रीत्या सर्व काही मिळेलच असे समजू नका. या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतु आहेच. त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील व मन अस्वस्थ राहील. शिवाय तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील व विवाहेच्छू असणारांना विवाहयोग येणे संभवत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो जलभयकारक व विषभयकारक असल्यामुळे पाण्यापासून जपावे लागेल. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ न खाण्याचा निर्धार करावा लागेल. या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो सर्व प्रकारे अनुकुल असला तरी वक्री असल्याने सहजासहजी सर्व काही मिळेल असे समजू नका. अध्यात्माची आवड असणारांनाही तो काही प्रमाणात अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे काही मंडळींना अधिकार पद मिळू शकेल; तर काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते.. येथील हर्षल बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यास अनुकुल असला तरी सध्या तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती होणे व यश मिळणे संभवत नाही. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल आणि मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत रवि - बुध- अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत जात आहेत. त्यामुळे रवि महिन्याच्या पूर्वार्धात पूर्णपणे प्रतिकुल होतील व त्याच्यामुळे डोळ्याचे अनारोग्य सहन करावे लागेल, व आर्थिक चिंता त्रस्त करतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि सर्व प्रकारे अनुकुल होईल व मनोनुकुल घटना घटना घडतील. बुध संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दुःख, शत्रुत्व होणे, शत्रुभय असणे संभवते. पण शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल होईल. पण तो अस्तंगत असल्यामुळे अपेक्षित कौटुंबिक सुखसमाधान लाभेलच याची खात्री देता येत नाही. काही मंडळींना मान, प्रतिष्ठा प्राप्त होणेही संभवते. तसेच धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत वक्री शनि असून तो काही प्रमाणात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल पण त्याच्यामुळे गैरसमजाने भांडणे होणे, अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू अनुकुल होईल व हर्षलमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मिथुन राशीत जात आहे. या मंगळामुळे नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण सहन करावा लागेल व स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात एखादी मौल्यवान वस्तू प्राप्त होणेही संभवते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “विष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या प्रथम(लग्न)स्थानी याच राशीत रवि -बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून ते सर्व महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे मनस्थिती अति चंचल होईल,

चिंता, दुःख, मनस्ताप, अनारोग्य, वित्त हानी, अन्य आर्थिक समस्या, मित्रद्रोह, कुसंगतीचा त्रास, अशापैकी घटना घडणे संभवते. शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होणार असल्यामुळे अर्थप्राप्ती, वैवाहिक, कौटुंबिक व सर्व प्रकारे सुखकारक होणार असला तरी तो अस्तंगत असल्यामुळे किरकोळ समस्या मधून मधून त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतू आहेच. त्याचमुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे मनस्थिती स्वार्थी, संशयी होणे संभवते. पण तो काही प्रमाणात चिकित्सक बौद्धिक व्यवसाय असणारांना अनुकूल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची चिंता त्रास करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. शिवाय त्याच्यामुळे फसवणूक झाल्याचा मनस्तापही सहन करावा लागेलसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी वक्री गुरु असून ज्यांचे प्रेमसंबंध जुळले आहेत ते अधिक घट्ट होताना काही अडचणी निर्माण होणे संभवते. नवे स्नेहसंबंध जुळून येतानाही अडचणी येणे संभवते. या राशीच्या विवाहेच्छूना विवाह योग असला तरी त्यात अडथळे निर्माण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे अर्थलाभ होणार असला तरी काही तरी अडचण निर्माण होऊनच अर्थलाभ होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे ज्यांना अधिकार पद प्राप्त झाले आहे अशापैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह अस्वस्थ करील. जपा. येथील वक्री हर्षल अपघातकारक असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे प्रवासात मनस्ताप, मानहानी होणे संभवते. सबब शक्यतो प्रवास करू नका. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम या नोकरी-व्यवसाय स्थानी गेल्यावर नोकरी-व्यवसायात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा कोप सहन करावा लागेल. काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. जपा. श्रद्धा असेल तर दुर्गा देवीची व शिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा" चे व ""दुर्गादेवी स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमें नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत रवि -बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत येथील रवि -बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अकारण दगदग, मानहानी, मनस्ताप, अनारोग्य होणे संभवते. शिवाय धननाश होणे, मित्रद्रोह होणे,कुसंगतीची बाधा होणे संभवते. पण शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काही प्रमाणात कौटुंबिक व वैवाहिक जीवनातील सुखसमाधान मिळू शकेल. ह्या राशीच्या प्रथम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतू आहेच. त्याच्यामुळे स्वभाव लहरी, चंचल होणे संभवते. ह्या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत केतु असून तो सुखकारक होईल; पण त्याच्यामुळे वाहनधोका संभवतो. जपा. ह्या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे दु:ख, नैराश्य, मातृसुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल पण तो वक्री असल्यामुळे अध्यात्म आणि गूढ संशोधनाची आवड असणारांना आपल्या कार्यक्षेत्रात अपेक्षित प्रगती करण्यात अडथळे निर्माण होतील. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे फारसे अनारोग्य होणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे मनात कपटी विचार निर्माण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. येथील हर्षलमुळेही पतिपत्नीत वाद, भांडणे, मतभेद होणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या व्यवसायात संशय, मतभेद, वाद अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे उष्णता विकाराचा आजार होणे संभवते. तसेच हाडमोड होणेही संभवते. जपा. त्याशिवाय त्याच्यामुळे जलभय, वीजभय असल्याने खोल पाण्यात पोहू नका, विजीची उपकरणे काळजीपूर्वक हाताळा. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास, मनस्ताप व मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर “शिवशंकराची” व “ श्रीहनुमानाची” उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नम::” तारक मंत्राचा, ज्यांचे

जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत रवि -बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत येथील रवि -बुध महिन्याच्या पूर्वार्धात सर्व प्रकारे अंनुकुल होतील व रविमुळे शासकीय नोकरदार मंडळींना बढती, पगारवाढ,क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळण्याची शक्यता दिसते. आरोग्य उत्तम राहील व स्वतंत्र व्यापार- व्यवसाय असणाराच्या व्यवसायात अपेक्षेपेक्षा अधिक प्रगती व अर्थलाभ होईल. बुधामुळे मित्रलाभ धनलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि-बुध दोन्ही गृह प्रतिकुल होतील व त्यांच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. रविमुळे शरीरपीडा होईल व मानभंग होणेही संभवते. बुधामुळे अनारोग्य, मानहानी, आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण येथील अस्तंगत शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल होईल; पण तो अस्तंगत असल्यामुळे काही प्रमाणातच धनलाभ होऊन सर्व प्रकारे सुख, शांती, समाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतू आहेच. त्याच्यामुळे स्वभाव चंचल, लहरी असा होणे संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत वक्री शनि असून या शनिमुळे काही मंडळींना नवी नोकरी मिळेल तर काही मंडळींना नवे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. पण भावंडविषयक एखादी समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात वाद,गैरसमज निर्माण झाल्यास गृहसौख्यात बाधा निर्माण होईल. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून तो अनुकुल असला तरी अपेक्षेनुसार तो सुखकारक होईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या विद्यार्थ्यांनाही अपेक्षित शैक्षणिक प्रगती करता येईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे परधर्मियांशी ज्यांचा व्यावसायिक संबंध आहे त्यांना अशा संबंधामुळे अर्थलाभ होणे संभवते. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. येथील वक्री हर्षल या राशीच्या दशम या नोकरी-व्यवसाय स्थानास काही प्रमाणात अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे मनस्थिती चंचल होईल, व काही मंडळींना मुदतीचा ताप येणे संभवते. तसेच या राशीच्या मंडळींनी सतत अति खोल विचार करत बसू नये. मेंदूला आवश्यक तेवढी विश्रांती द्यावी. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार होणे संभवते.जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे पतिपत्नीपैकी

कोणाच्या अनारोग्यामुळे किंवा दोघांतही वाद, गैरसमज अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. हा मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अधिकच प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे उष्णताविकाराचा एखादा आजार अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय येथील मंगळ जलभय-विषभय- कारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहू नका.. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर "श्री गजाननाची " व "श्रीहनुमानाची "उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती आणि मन:शांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी "ओम मित्राय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी "ओम इंद्राय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु-** या राशीच्या धनस्थानी मकर राशीत वक्री शनि असून तो संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. शिवाय आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल. त्याच्यामुळे काही मंडळींना जलप्रवासाची तर काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यता दिसते. तसेच अध्यात्म, गूढ संशोधन कार्याची मनापासून ओढ असणारांना त्यांच्या कार्यात प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीं राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल; पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहूमुळे या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात व संततिसुखात बाधा निर्माण होणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडचणी, अडथळे निर्माण होणे संभवते. येथील हर्षल उच्च बौद्धिक संशोधन कार्यास उपयुक्त व कालापोषक असला तरी तो वक्री असल्यामुळे सहजासहजी प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होणे संभवत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत महिन्याच्या पूर्वार्धात तो अनारोग्यकारक होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे शारीरिक इजा होणेही संभवते. काही मंडळींना अपप्रचाराचा

मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यताही दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे या राशीच्या विवाहितांच्या. वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे अशांनी वाद, गैरसमज, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत रवि-बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि व बुध महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायक होतील. पण अस्तंगत शुक्र महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे सर्व काही सुखाचेच घडेल. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतू आहेच. तो अनुकुल व सुखकारक होईल. श्रद्धा असेल तर "श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल आणि मनःशक्ती व मनःशांती लाभेल.. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करतांना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत वक्री शनि असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे स्थलांतर होणे, त्यामुळे नैराश्य येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तोही प्रतिकूलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक व्यवहारातील समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते, या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे एखाद्या भावंडांकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. शिवाय प्रवासात अडचणी येतील, मनस्ताप होणे संभवते. तसेच या राशीच्या लेखकांचे लिखाण ग्रंथरूपात प्रकाशित होण्यात अडचणी निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे कौटुंबिक सुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच येथील वक्री हर्षलमुळे मनस्थिती अस्वस्थ राहील व कशातही सुख, समाधान वाटणार नाही. कोणाशी पटणार नाही व आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे संततीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. नोकरीत

कामाचा असह्य  ताण सहन करावा लागेलसे दिसते.  शिवाय वरिष्ठांकडून  मनस्ताप दिला जाणे संभवते. त्याशिवाय त्याच्यामुळेउष्णताविकाराचा आजार होणे समभवते.  महिन्याच्या उत्तरार्धात  हा मंगळ  या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर अधिक प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे  या राशीच्या काही मंडळींना अपप्रचाराचा  असह्य त्रास होणे संभवते. काही मंडळींना एखादा गंभीर आजार होण्याची  शक्यता दिसते. त्याशिवाय इजा होणे, चोरी होणे, आर्थिक नुकसान होणे अशापैकी घटना   घडणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत रवि -बुध - अस्तंगत  शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या दशम स्थानी तुळा  राशीत  जात आहेत. अशा परिस्थितीत रवि  आणि बुध  हे दोनही ग्रह महिन्याच्या  पूर्वार्धात प्रतिकुल  होतील व त्यांच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होणे, दिरंगाई होणे, असह्य मानसिक ताण होणे, वडील मंडळींचा  विरोध सहन करावा लागणे, कशाची  तरी भीती वाटणे, अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळे काही प्रमाणात मनोनुकुल  घटना घडतील, सुसंगती लाभेल, ऐषाराम लाभेल, गुरुकृपा प्राप्त होईल,  काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी लाभेल, अध्यात्माची आवड असणारांना काही प्रमाणात प्रगती करणे शक्य होईल, पण महिन्याच्या उत्तरार्धात  हा शुक्र या राशीच्या दशम स्थानी तुळा  राशीत गेल्यावर  कलात्मक नोकरी,व्यवसाय असणारांच्या व्यवसायात दुःख,  अडचणी,  अडथळे निर्माण होणे संभवते. उलट रवि -बुध  या राशीच्या दशम स्थानी तुळा  राशीत गेल्यावर  अनुकुल होतील व त्यांच्यामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल,  धनवृद्धी होईल, नोकरी-व्यवसायात लाभदायक घटना घडतील, क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. आर्थिक लाभ होतील. या राशीच्या दशम स्थानी तुळा  राशीत प्रथमपासून केतू आहेच. त्याच्यामुळे

या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल.  श्रद्धा असेल तर "श्रीशिवशंकराची " आणि " श्रीहनुमानाची" उपासना अनुकुल  होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत  स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी    श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय  दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र  श्रवण आहे  त्यांनी  "ओम विष्णवे  नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे  नमः:" तारक मंत्राचा  १०८ वेळा  जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अति कोमल झाली असावी, असे दिसते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील, असे वाटते. त्याचा परिणाम म्हणून मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या धनस्थानी मीन राशीत वक्री गुरु असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडतील. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ व प्रगती होईल. अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती उदार होईल, उत्साह वाढेल, हातून काही कर्तृत्व घडेल; पण त्याच्यामुळे काहीही कारणाने बंधुसुखात बाधा निर्माण होणे संभवते. या स्थानी असलेल्या वक्री हर्षलमुळे उच्च बौद्धिक शक्ती, कार्यशक्ती, आकलनशक्ती व स्मरणशक्ती लाभली असली तरी तो वक्री असल्यामुळे या राशीच्या उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यक्षेत्रात सहजासहजी प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होणार नाही. तसेच या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळणार असली त्यांचा प्रवास सुखकारक होईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या पंचम स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच एखादी असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. महिन्याच्या उत्तरार्धात संततीपैकी कोणाच्या विक्षिप्त आचरणविषयक समस्येमुळे अस्वस्थ व्हाल. तसेच तो अनारोग्यकारक होणेही संभवते. शिवाय कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होईल. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत रवि -बुध- अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून येथील रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, दुःख होणे, अपयश येणे, संतति सुखात बाधा येणे संभवते. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यमुळे नियोजित कार्यात प्रगती होईल व यश मिळेल. सुखसमाधान लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि बरोबर बुधही प्रतिकुल होईल व मन अस्वस्थ करणाऱ्या घटना घडतील. येथील वक्री शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल, सुखकारक व लाभदायकच होईल; व काही मंडळींना अचानक धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी तुला राशीत प्रथमपासून केतू आहेच. त्याच्यामुळे हातून ढोंगी, धूर्त आचरण घडेल. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत वक्री शनि असून तो पूर्णपणे प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य व संकटपरंपराच कोसळण्याची शक्यता दिसते. त्यामुळे सर्व आर्थिक व्यवहार

सावधानतेने व काळजीपूर्वकच करा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी "ओम अजैकचरणाय नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन --** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे मनस्थिती अति चंचल, अस्थिर होईल, तसेच कोणाचाही कसलाही धाक, दडपण सहन होणार नाही. त्यातून हातून अविचारी आचरण घडणे संभवते. आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचे भानही राहणार नाही. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यास उपयुक्त असला तरी तो वक्री असल्यामुळे किती प्रमाणात प्रगतिकारक होईल ते सांगता येणार नाही. येथील राहूमुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे होणे संभवते. तसेच आर्थिक समस्या चिंताग्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. . या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत जात आहे. अशा परिस्थितीत तो महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तृत्व घडेल. तसेच प्रवासयोग येणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन राशीत गेल्यावर प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच त्याच्यामुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत रवि -बुध -अस्तंगत शुक्र असे तीन ग्रह असून हे तिन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल.व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख होणे, हाडमोड होणे, वीज व पाणी यांपासून धोका असणे संभवते. पण महिन्याच्या पूर्वार्धात तो केन्द्रस्थानी असल्यामुळे लाभदायक होऊ शकेल. बुध ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकूल होईल व त्याच्यामुळे कार्यसिद्धी होईल, यश मिळेल, व सुख लाभेल. येथील अस्तंगत शुक्र महिन्याच्या संपूर्ण

काळात अनुकुल व लाभदायक होणार असला तरी तो अस्तंगत असल्यामुळे किती प्रमाणात तो सुखकारक व लाभदायक होईल ते सांगता येत नाही. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत प्रथमपासून केतु आहेच. त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत वक्री शनि असून तो काही प्रमाणात अनुकुल होईल; पण त्याच्यामुळे मुलांपैकी कोणास अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून तो गुप्त पोलीस खात्यात कार्यरत असणारांना काही प्रमाणात अनुकुल होईल; पण इतरांना चिंता,अस्थिर चंचल मानसिक अवस्था त्रस्त करील व कसली तरी चिंता अस्वस्थ ठेवील. त्यामुळे नैराश्य येणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====°°°°°0°°°°°°=====